## <u>प्रकरण *2*</u>

## (नियमावली - I)

## संघटन, कार्यप्रणाली व कर्तव्ये ह्याबाबतचा तपशिल

### 2.1 उद्देश / हेतू

महामार्ग व मुक्त मार्ग, महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ यांच्या अख्यारित असलेले महामार्ग, मुक्त मार्ग, तसेच, मुंबई महानगर क्षेत्र विकास प्राधिकरण, मुंबई गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरण, सार्वजनिक बांधकाम विभाग, मुंबई बंदर व विकास मंडळ ह्यांच्या हद्दीतील रस्ते तसेच खाजगी अभिन्यासातील खाजगी रस्ते सोडून, बृहन्मुंबईच्या हद्दीतील सार्वजनिक रस्ते त्यांचे बांधकाम करणे तसेच परिरक्षण करणे.

### 2.2 विशेष काम

बृहन्मुंबईमध्ये शहर हद्दीत 506.46 कि.मी. पश्चिम उपनगरात 927.65 कि.मी. व पूर्व उपनगरात 507.05 कि.मी. असे मिळून एकूण 1941.16 कि.मी. एवढ्या लांबीचे रस्ते आहेत. प्रवासासाठी उत्तम असलेल्या व बदलत्या हवामानाचा कोणताही परिणाम न होणारे रस्ते तयार करण्याच्या उद्देशाने सन 1989 मध्ये रस्त्यांचे सिमेंट कॉक्रटीकरण करण्याचा कार्यक्रम सुरु करण्यात आला आणि आतापर्यंत टप्प्या-टप्प्याने एकूण 720.83 कि.मी. लांबीचे रस्ते सिमेंट कॉक्रीटचे करण्यात आले आहेत.

### 2.3 संक्षिप्त इतिहास

महानगरपालिकेमध्ये इ.स. 1998 साली प्रमुख अभियंता (रस्ते व वाहतूक) ह्या विभागाची स्थापना करण्यात आली तत्पूर्वी प्रमुख अभियंता (रस्ते व प.ज.वा.) ह्या खात्याचे एकच प्रमुख अभियंता होते. मुंबईमध्ये रस्त्यांचे परिरक्षण करण्याची जबाबदारी वाढल्यामुळे स्वतंत्र प्रमुख अभियंत्यांची नेमणूक करण्यात आली. पूल खाते 18.11.2006 रोजी प्रमुख अभियंता(रस्ते व वाहतुक) खात्यात एकत्र केले गेले. माहे एप्रिल 2013 पासून प्रमुख अभियंता (पूल) असे स्वंतत्र खाते निर्माण करण्यात आले.

**2.4 खात्याचे काम**

1. अर्थसंकल्पीय तरतूदीमधून अंदाजपत्रकानुसार रस्त्यांवरील खड्डे अस्फाल्ट किंवा सिमेंट काँक्रीटने बुजविणे.
2. महानगरपालिका अस्फाल्ट प्लान्टमधून विभागवार असफाल्टचा पुरवठा करुन रस्ते वाहतुकीस योग्य करणे व मुख्य रस्ते ह्यांकरिता कंत्राटदाराकडून काम करुन घेणे.
3. असतित्वात असलेल्या रस्त्यांवर रेषा घालून घेणे व प्रस्तावित रस्त्यांसाठी नविन रस्ता रेषा आखणे.
4. वाहतूक पोलिसांबरोबर विचार विनिमय करुन रस्ते दुभाजक कर्बस्टोन बसविणे, आरेखित करणे, सिग्नल यंत्रणा बसविणे इ. कामे करणे..
5. मुख्य रस्त्यावरील मार्गिका, झेब्रा क्रॉसिंग इत्यादी थर्मोप्लास्ट मध्ये रंगविणे.
6. **नियोजित रस्ता / रस्ता रुंदीकरणाच्या क्षेत्रातील रस्त्याचे काम करण्याबाबत संबंधित विकासक / भूधारक यांना अभिप्राय देणे.**
7. **महानगरपालिकेच्या रस्त्यांच्या कामासाठी, आर.एम.सी. प्लान्ट / अस्फाल्ट प्लान्ट / पेव्हर ब्लॉक / क्रशर / पूर्वाकारीत वस्तू उत्पादनाचे यंत्रसंच यांचे तसेच खाजगी सामुग्री चाचणी प्रयोगशाळा यांचे नोंदणीकरण व नुतनीकरण करणे.**

**2.5 प्रमुख अभियंता (रस्ते व वाहतूक) ह्या विभागाची प्रमुख कामे पुढीलप्रमाणे**

1. अस्तित्वात असलेल्या रस्त्यांचे परिरक्षण करणे.
2. नविन रस्त्यांचे बांधकाम/ निर्माण करणे
3. वाहतूक पोलिस व विभाग कार्यालयांशी सल्लामसलत करुन रस्त्यांवर सिग्नल तसेच दुभाजक, आरेखन वगैरे ह्यांचे परिरक्षण करणे व पुरविणे.
4. वाहतूक पोलिस आणि विभागीय कार्यालये ह्यांजबरोबर सल्लामसलत करुन रस्त्यांवर मुंबई विद्युत पुरवठा व परिवहन, रिलायन्स एनर्जी आणि महाराष्ट्र राज्य विद्युत महामंडळ ह्यांजमार्फत दिवाबत्तीची सोय करणे.
5. वाहतूकीसंदर्भात आढावा घेऊन रस्त्यांचे रुंदीकरण करणे आणि नविन रस्त्यांचे आरेखन करणे.
6. वाहतूक पोलिस आणि विभागीय कार्यालये ह्यांच्याबरोबर सल्लामसलत करुन "पे एँण्ड पार्क" ह्या योजनेची रचना करुन अंमलबजावणी करणे.
7. नियोजित रस्ता / रस्ता रुंदीकरणाच्या क्षेत्रातील रस्त्याचे काम करण्याबाबत संबंधित विकासक / भूधारक यांना अभिप्राय देणे.
8. महानगरपालिकेच्या रस्त्यांच्या कामासाठी, आर.एम.सी. प्लान्ट /अस्फाल्ट प्लान्ट / पेव्हर ब्लॉक / क्रशर / पूर्वाकारीत वस्तू उत्पादनाचे यंत्रसंच यांचे व खाजगी सामुग्री चाचणी प्रयोगशाळा यांचे नोंदणीकरण व नुतनीकरण करणे.

**2.6 खालील सुविधा पुरविल्या जातात.**

1. पे एँण्ड पार्क योजना - बृहन्मुंबई महानगरपालिकेने सह आयुक्त पोलिस (वाहतूक) ह्यांजकडून ना हरकत प्रमाणपत्र प्राप्त करुन मुंबईतील रस्ते, वहातूक बेटे ह्याठिकाणी "पे एँण्ड पार्क" ही योजना सर्व नागरिकांना पार्किंगचे पैसे देऊन त्यांची वाहने पार्क करण्यासाठी अंमलात आणली आहे.

2. रस्त्यांवर दिवाबत्तीची सोय करणे व परिरक्षण करणे - बृहन्मुंबई महानगरपातिलकेच्या सर्व रस्त्यांवर दिवाबत्तीची सोय करणे. विभाग कार्यालये ह्यांजबरोबर सल्लामसलत करुन विकास नियोजन रस्त्यांवर मुंबई विद्युत पुरवठा व परिवहन, रिलायन्स एनर्जी आणि महाराष्ट्र राज्य विद्युत महामंडळ ह्यांजमार्फत नियमाप्रमाणे भाडेतत्वावर दिवाबत्तीची सोय केली जाते व संबंधित संस्थांना रक्कम देऊन देखभाल केली जाते.

3. रस्ते सुरक्षा दुभाजक पुरविणे व परिरक्षण करणे - सहाय्यक आयुक्तांच्या सल्ल्यानुसार कंत्राटदार नेमून रंगांचा पुरवठा क रणे व बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या रस्त्यांवर कडेला दगडांची फुटपाथ तयार क रणे, जाळी लावणे व दुभाजक तयार करणे, रंगवणे. खाजगी संस्थांकडून काहीवेळेस जाळया लावणे, रस्त्यांचे सुशोभिकरण करणे/ रस्त्यांवर बाके बसविणे यांचा पुरवठा केला जातो.

4. अस्तित्वात असलेल्या रस्त्यांचे परिरक्षण करणे - बृहन्मुंबई महानगरपालिका मोठया तसेच लहान रस्त्यांची देखभाल विभाग कार्यालयाला अस्फाल्टचा पुरवठा करुन विभागीय पातळीवर काम करुन घेत असते. पावसाळयात मोठे रस्ते, बस मार्गक्रमण खाजगी संस्थांकडून करुन घेतले जातात व विभागीय कार्यालयाकडून प्रमुख अभियंता (रस्ते व वाहतूक) यांच्या अधिपत्याखाली देखरेख केली जाते. पावसाळयात विभागातील महानगरपालिका अस्फाल्ट प्लान्ट मधून पुरविलेल्या अस्फाल्ट मिक्सद्वारे छोटया रस्त्यांचे परिरक्षण केले जाते.

5. रस्त्यांवरील दुभाजक, दिशा दर्शक/मार्गदर्शक फलक इत्यादींमुळे वाहतूक नियंत्रित तसेच सुरळीत होण्यास मदत होईल.
6. व्हेरिएबल मेसेजिंग सिस्टीम व परिसर वाहतूक नियंत्रण (एटीएस) या आधुनिक वाहतूक सिग्नल पध्दतींच्या वापरामुळे वाहतूक नियंत्रित तसेच सुरळीत होण्यास मदत हाईल.
7. हेरीटेज वॉकमुळे पुरातन वारसा वास्तूंच्या विषयी मोठया प्रमाणावर जागृती निर्माण होईल आणि पुरातन वारसा वास्तू व परिसराकडे अधिकाधिक पर्यटक आकर्षित होतील.
8. महानगरपालिका, राज्य सरकार, लोकांच्या अधिपत्याखालील वगैरे ह्यांच्या योग्य वर्गवारी असलेल्या कंत्राटदारांकडून अर्थसंकल्पीय तरतूदीच्या उपलब्धतेनुसार, विभाग कार्यालय, महानगरपालिका नगरसेवक व लोक प्रतिनिधी यांच्या सल्ल्यानुसार खराब झालेल्या रस्त्यांची सुधारणा करण्यासाठी लोकल निविदा मागविण्यात येतात.

**2.7** संघटनात्मक मांडणी

| |
|---|
| प्रमुख अभियंता (रस्ते व वाहतूक ) |
| कार्यकारी अभियंता - 2 |
| सहा.अभियंता - 2 |
| दुय्यम अभियंता – 3 |
| कनिष्ठ अभियंता – 3 |

## प्रशासकीय संवर्गातील पदे

| अ.क्र. | संवर्ग | एकूण पदे |
|---|---|---|
| 1 | प्रशासकीय अधिकारी | 2 |
| 2 | मुख्य लिपिक | 3 |
| 3 | लिपिक | 9 |
| 4 | वरिष्ठ लघुलेखक | 1 |
| 5 | कनिष्ठ लघुलेखक | 1 |
| 6 | हविलदार | 1 |
| 7 | नाईक | 1 |
| 8 | शिपाई | 10 |

2.8 अ) महापालिकेच्या संस्था, वैयक्तिक व वेगवेगळया उपयोगिता यांनी चर खणल्यामुळे रस्ते खराब होतात. बांधकाम चालू असताना बांधकाम साहित्य साठविणे, ओली माती पसरणे, सांडपाणी पसरल्यामुळे, डेब्रीज ठेवल्यामुळे गटार तुंबणे, तंबू बांधणे, स्टॉल बांधण्यासाठी खड्डे उत्खनन करणे वगैरेमुळे रस्ते खराब होतात. रस्त्यावर विनापरवानगी चर खणण्यात आल्याचे व इतर कारणांमुळे रस्ते खराब झाल्याचे निदर्शनास आल्यास लोकांनी स्थानिक विभाग कार्यालयाला ताबडतोब कळविल्यास त्वरीत कारवाई केली जाईल.

ब) रस्ते सुधारण्याचे वेळेस वाहतूक वळविण्यास सहकार्य करावे.

क) रस्त्यांच्या मालमत्तेचे संरक्षण करणे व वाहन तळांचे नियमन करणे.

ड) रस्त्यांवरील खड्डे बुजविणे, परिरक्षण करणे, साफसफाई करणे व सौंदर्य वाढविणे.

2.9 महानगरपालिकेच्या मध्यवर्ती तक्रार निवारण कक्षातील 1916 ह्या नंबरावरुन तक्रार नोंदविता येते किंवा परस्पर खात्याकडे पत्रव्यवहार करुन करता येते किंवा स्थानिक विभागीय कार्यालयात सूचना, तक्रार करता येते.

2.10 संबंधित तक्रारींचे युद्ध पातळीवर निवारण करण्यात येते तसेच विभागीय सहाय्यक आयुक्त, विभागीय उप प्रमुख अभियंता ह्यांजकडून प्रत्येक महिन्याला अभिप्राय देण्यात येतो. महानगरपालिकने सद्या 1800221293 हे फक्त महानगर टेलिफोन निगम लि.च्या नेटवर्कद्वारे टोल फ्री दुरध्वनी क्रमांक कार्यान्वित केले असून त्यावर नागरिकांकडून खराब रस्ते व खड्ड्यांच्या तक्रारी स्वीकारण्यात येतात तसेच सदर बाबतीत MCGM 24 X 7 हे मोबाईल ॲप देखील मनपाने कार्यान्वित केले आहे. सदर ॲपवर नागरिक तक्रारींचे फोटो अपलोड करु शकतात. तसेच मनपाची वेबसाईट http://portal.mcgm.gov.in वर नागरिक रस्त्यांबाबत तक्रारी सादर करु शकतात. मोबाईल ॲप सदर वेबसाईट वर नागरिकांना रस्त्यांच्या तक्रारींची स्थिती कळू शकते.